**CNR No. MHWR030057142021**
**नि. फौ. ख. क्र. ८२६/२०२१**
**सरकार / ॠत्विक**
**<u>नि.क्र. १८</u>**

## अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ३ ची शपथेवर साक्ष

मी सत्य प्रतिज्ञेवर सांगतो की —

माझे नाव : ललित रामचंद्र गुरनुले,

वय : ३६ वर्षे, व्यवसाय : खाजगी नोकरी,
रा. : सिंदी मेघे, वर्धा, ता. जि. वर्धा.

## <u>अभियोगपक्षातर्फे सरतपास विद्वान सहा. सरकारी अभियोक्ता श्री. ए. एस. पठाण मार्फत</u>

१. मला दि. २९/०९/२०२१ रोजी पोलिसांनी रामनगर पोलिस स्टेशन येथे बोलविले होते. त्याकरीता त्यांनी मला सुचनापत्र दिले होते. ते अभिलेखावर दाखल आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. करीता त्यास **नि.क्र. पी—४/पीडब्ल्यु३** देण्यात येते. त्यानंतर मी रामनगर पोलिस स्टेशन येथे गेलो होतो. तेथे पोलिसांनी आरोपी ॠत्विक याचेकडून एक पांढरा—गुलाबी रंगाचा आयफोन जप्त केला होता आणि माझेसमक्ष सिल केला होता. त्यानंतर पोलिसांनी पंचनामा करून त्यावर माझी सही घेतली होती. सदरचा पंचनामा अभिलेखावर दाखल आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. करीता त्यास **नि.क्र. पी—५/पीडब्ल्यु३** देण्यात येते.

२. पोलिसांनी ज्या आरोपीच्या ताब्यातून तो मोबाईल जप्त केला होता त्याला बघितल्यावर मी ओळखू शकतो. तो आज न्यायालयात हजर आहे. *(साक्षीदाराने न्यायालयात उपस्थित आरोपीकडे बोट दाखविले.)* तसेच जो मोबाईल जप्त केला होता तो सुध्दा बघितल्यावर ओळखू शकतो. सदर पंचनाम्याचे वेळी माझेसोबत दुसरा स्वप्नील ठाकरे सुध्दा हजर होता.

**सर तपास पुर्ण.**

## <u>उलट तपास आरोपीतर्फे अधिवक्ता श्रीमती आर. एस. वीर मार्फत</u>

३. हे म्हणणे खरे आहे की, मला लिहिता वाचता येते. हे म्हणणे खरे आहे की, पांढ—या—गुलाबी रंगाचे मोबाईल हे दुकानामध्ये सहज उपलब्ध असतात. हे म्हणणे खरे आहे की, कोणताही व्यक्ती आयफोन घेवू शकतो. हे म्हणणे खरे

आहे की, मी पंचनाम्याचे पुर्वी आरोपीला बघितलेले नसल्याने त्याला ओळखत नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी रामनगर येथील रहिवाशी असल्याने मला तेथील पोलिसांबद्दल माहिती आहे आणि पोलिस सुध्दा मला ओळखतात.

४. हे म्हणणे खरे आहे की, सदर ओळखीमुळे पोलिसांनी मला पंचनाम्याकरीता सुचनापत्र दिले होते. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे मी पोलिस स्टेशनला जावून पंचनाम्यावर सही केली होती. हे म्हणणे खरे नाही की, मी सदर पंचनाम्यावर न वाचता सही केली. हे म्हणणे खरे नाही की, मी माझे सरतपासात सांगितलेल्या बाबी खोटया व चुकीच्या आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मी पोलिसांना मदत करण्याच्या उद्देशाने आरोपीविरूध्द आज न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

**उलट तपास पुर्ण.**

**फेरतपास काही नाही.**

सा. वा. दा. ब. अ. क. के.

माझे समक्ष,

Digitally signed by VICKRANT PRALHAD KHANDARE
Date: 2026.07.18 15:56:53 +0530

( वि. प्र. खंदारे )
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, वर्धा.
(फौजदारी न्यायालय क्र. १)

न्यायदंडाधिकारी, प्र.व., वर्धा.
दिनांक : १८/०७/२०२६